# विपश्यना

साधक

साधकांचे
मासिक प्रेरणा पत्र

वार्षिक शुल्क रु. 30/-
आजीवन शुल्क रु. 500/-

**बुद्धवर्ष २५५८, आश्विन पौर्णिमा, ८ ऑक्टोबर, २०१४ वर्ष १ अंक ६**

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः - http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx


## धम्मवाणी

**"सब्बे धम्मा अनत्ता"ति, यदा पञ्ञाय पस्सति।**
**अथ निब्बिन्दति दुक्खे, एस मग्गो विसुद्धिया॥**

*धम्मपद- २७९, मग्गवग्गो.*

'सर्व धर्म अनात्म आहेत' (म्हणजे, लोकीय वा लोकोत्तर जे काहीही आहे, ते सर्व अनात्म आहे, 'मी', 'माझे' नाही.). या (सत्या) ला जेव्हा कोणी (विपश्यना) प्रज्ञेने पाहतो (जाणतो), तेव्हा त्याला सर्व दुःखांपासून निर्वेद प्राप्त होतो (म्हणजे, दुःखक्षेत्राप्रती भोक्ताभाव सुटतो.) - असा आहे हा विशुद्धी (विमुक्ती) चा मार्ग !

# महासमय सुत्ताची व्याख्या

रंगून, १३-६-६८

प्रिय शंकर ! सीता ! राधे ! विमला !

धर्मचारी बना !

आज 'महासमय' दिवस आहे. आजच्या दिवशी भगवान बुद्धांनी महासमय सुत्ताची घोषणा केली होती.

तुम्ही ऐकले असेल, बुद्धांच्या जीवनकाळात शाक्यवंशी क्षत्रियात व बुद्धांच्या आजोळचे कोलियवंशी क्षत्रिय यांच्यात नेहमी वैमनस्य राहत होते. रोहिणी नावाच्या नदीच्या एका बाजूला शाक्य व दुसऱ्या बाजूला कोलिय क्षत्रिय वसलेले होते. आपसातील भांडणांचे एक खूप मोठे कारण ह्या नदीचे जल होते, जे दोन्ही बाजूंच्या शेतांना सिंचन करण्यासाठी वापरले जात होते. कधी-कधी जेव्हा नदीतील पाणी कमी व्हायचे व उष्णतेमुणे दोन्ही बाजूंच्या शेतांना सिंचनाची खूप गरज असायची तेव्हा दोघातील तणाव खूप वाढायचा. नदीत पाणी इतके नसायचे की दोन्ही बाजूंच्या शेतांना सिंचन केले जाऊ शकेल, तेव्हा कोणी किती पाणी घ्यावे यावर तक्रारी वाढायच्या.

एकदा कडक उन्हाच्या दिवसात याचबाबीवर दोन्ही पक्षांचे भांडण इतके वाढले की म्यानातून तलवारी बाहेर निघाल्या. दोन्ही बाजूचे क्षत्रिय आपापल्या मागण्यांवर अडून बसले. सेना युद्धासाठी तयार झाली, युद्ध दुदुंभी वाजली.

भगवानांनी आपल्या योगबळाने पाहिले की त्यांच्या वंशाचे लोक परस्परांचा जीव घेण्यासाठी तयार झालेले आहेत. ते तत्काळ युद्धस्थळी पोहोचले व दोन्ही बाजूंच्या योद्धांना समजवतांना म्हणाले की त्या तुच्छ नदीजलापेक्षा तुम्हा क्षत्रिय कुमारांच्या धमनीतील रक्त खूप अधिक मूल्यवान आहे. त्याला व्यर्थ जमिनीवर वाहवू नका. त्यानंतर दोन्ही दळांना शांत करतांना त्यांनी धर्म जागवणारा उपदेश दिला. सत्यवाणी ऐकूण ५०० युवा शाक्य व कोलिय राजपुत्र योद्धा यांना त्याच क्षणी धर्मसंवेग जागला व ते घरातून बेघर होऊन, प्रव्रज्या ग्रहण करून, बुद्धांच्या भिक्षुसंघात सामील झाले. ह्या ५०० भिक्षूंनी बुद्धांकडून विपश्यना ध्यान शिकून अत्यंत उन्नत अरहंत फळाची अवस्था प्राप्त केली. आता ह्या ५०० तरुण तेजस्वी अरहंत भिक्षूंसोबत भगवान कपिलवस्तूपासून दूर हिमवंत प्रांताच्या महावन नावाच्या अरण्यात जाऊन थांबले.

भगवान म्हणाले- जेव्हा कोणी (युवा ब्रह्मचारी) ब्रह्माचरणयुक्त व्यक्ती भिक्षू बनून अरहंत पद प्राप्त करते, तेव्हा ती आपल्या संपूर्ण चित्तमळांना नष्ट करून अशी प्रकाशित होते जसे निरभ्र आकाशात पौर्णिमेचा चंद्र चमकतो.

ह्या ५०० ओजस्वी अरहंतांसोबत जेव्हा भगवान हिमवंताच्या महावनात विहार करीत होते, तेव्हा विभिन्न देवलोकात याची चर्चा सुरू झाली व दहा लोकांचे अनेक देवगण बुद्ध-प्रमुख चंद्रासमान चमकत्या नव भिक्षूंच्या दर्शनासाठी या महावनात एकत्रित झाले. वेगवेगळ्या चक्रवालांतील व वेगवेगळ्या देव, ब्रम्ह लोकांतील आकाश व जमिनीवरील देवांपैकी अनेकांनी उल्हासाने भरपूर अशी गाणी गायली -

**तत्र भिक्खवो सम्मादहंसु, चित्तमत्तनो उजुकं अकंसु।**
**सारथीव नेत्तानि गहेत्वा, इन्द्रियानि रक्खन्ति पण्डिता।।**

*(– दी.नि. २.७.३३२, महासमयसुत्तं)*

- भिक्षुगण आपल्या चित्ताला सरळ करून एकाग्रचित्त आहेत, ध्यानमग्न आहेत, जसे ज्ञानीजन कुशल सारथ्याप्रमाणे इंद्रियरूपी घोड्यांच्या लगामांना ओढून वश करतात.

अनेक वर्ण व अनेक आकार-प्रकाराच्या, दिव्य वस्त्राभूषणांनी अलंकृत देवतांना ह्या नवीन भिक्षूंबद्दल व बुद्धांप्रती विपुल श्रद्धावान होऊन प्रसन्नता व हर्ष प्रकट करतांना पाहून भगवानांनी भिक्षूंना त्या देवतांबाबत सांगितले. ते देवता पृथ्वीच्या वेगवेगळ्या भागातून, पर्वतांच्या गुहेमधून व अंतरिक्ष स्थित देवलोकातून आले होते. ते सिंहासमान दृढ, निर्भय, रोमांचरहित, पवित्र मनाचे, शुद्ध, प्रसन्न, निर्दोष व ध्यानारूढ होते.

भगवानांना वाटले की या भिक्षूंनीही या देवतांना पाहावे, त्यामुळे त्यांनी भिक्षूंना दिव्य चक्षू प्राप्त करण्यासाठी योग्य ध्यान मार्ग शिकवला. थोड्याशा प्रयासाने सर्वांनी उत्साहपूर्वक प्रयत्न करत दिव्य चक्षू प्राप्त केले. त्यांना देवतांना पाहण्यायोग्य ज्ञान उत्पन्न झाले. त्यापैकी काही भिक्षूंनी शंभर देवतांना, काहींनी हजारांना, काहींनी सत्तर हजारांना, काहींनी लाख देवतांना पाहिले. काही-काहींनी तर सर्व दिशांना असंख्य देवतांनी भरलेले पाहिले. *(– दी.नि. २.७.३३४, महासमयसुत्तं)*

जेव्हा सर्व भिक्षू या प्रकारे देवदर्शी झाले, तेव्हा भगवानांनी त्या एकत्रित देवतांपैकी अनेकांचा परिचय करतांना म्हटले की हे सर्व अशा चित्तमळरहित, काळीमारहित, चंद्रासमान महानाग रूपी भगवान बुद्ध व त्यांच्या भिक्षूंचे दर्शन करण्यासाठी आलेले आहेत, जे भिक्षू पुढील जन्मांपासून मुक्त झालेले आहेत, आसक्ती, द्वेष व मोहापासून सुटलेले आहेत व भवबाधांच्या पार गेलेले आहेत. त्यानंतर या देवतांच्या नाव-गावाची घोषणा करतांना भगवानांनी यांच्या रंगीबेरंगी असण्याचा उल्लेख केला व जवळपास सर्वांसाठी असे म्हटले -

**इद्धिमन्तो जुतिमन्तो, वण्णवन्तो यसस्सिनो।**
**मोदमाना अभिक्कामुं, भिक्खूनं समितिं वनं।।**

*(-- दी.नि. २.७.३४०, महासमयसुत्तं)*

- ऋद्धिमान, प्रकाशमान, तेजस्वी वर्णाचे व यशस्वी देवता प्रसन्न होऊन या वनात भिक्षूंच्या या संमेलनाला पाहण्यासाठी आले आहेत.

तेव्हा भगवानांनी सांगितले की इंद्र व ब्रह्मासहित या अनेक देवतांच्या आगमनामुळे दुष्ट मारदेवही आपल्या मार सेनेसहित आला व येताच माराने भयंकर आवाजात हल्ला केला -

**एथ गण्हथ बन्धथ, रागेन बद्धमत्थु वो।**
**समन्ता परिवारेथ, मा वो मुञ्चित्थ कोचि नं।।**

- 'या ! पकडा ! बांधा ! सर्वांना आसक्तीच्या बंधनात अडकवा वश करा ! कोणीही वाचता कामा नये !' या प्रकारे मेघासमान गरजत व

विजेप्रमाणे कडकडाट करत मार आपल्या भयंकर सेनेसह पोहोचला. भगवानांनी भिक्षूंना संबोधित करत म्हटले -

**मार सेना अभिक्कन्ता, ते विजानाथ भिक्खवो।**

*(– दी.नि. २.७.३४२-३४३, महासमयसुत्तं)*

- हे भिक्षूंनो ! जाणून घ्या, समजून घ्या की ही मार सेना आलेली आहे.

बुद्धांची घोषणा ऐकून सारे वितरागी भिक्षू परिश्रमपूर्वक जागृत झाले व या प्रकारे ती मार सेना पराभूत होऊन पळून गेली. या भिक्षूंचा एक केसही वाकडा करू शकली नाही. -- **नेसं लोमापि इञ्जयुं।** सर्व संग्राम जिंकलेले निर्भय व यशस्वी बुद्ध श्रावक प्रसन्न झाले.

जे लोक या शक्तींच्या अस्तित्वाला स्वीकारतात, त्यांच्यासाठी एक-दोन बाबी अजून लक्ष देण्यायोग्य आहेत. आम्ही पाहातो की बुद्धांद्वारे शिकवल्यावर व स्वतः प्रयत्न केल्यावर सर्व ५०० अरहंतांनी दिव्यदृष्टी प्राप्त केली, ज्यामुळे ते या अदृश्य प्राण्यांना स्वतः पाहू शकतील. स्पष्ट आहे की दिव्यदृष्टी प्राप्त करणे ही एक प्रकारची साधना आहे, जिला योग्य गुरूच्या  मार्गदर्शनाखाली प्रयत्नशील सुपात्र शिष्य प्राप्त करू शकतो. दुसरी महत्वपूर्ण बाब ही आहे की ह्या अरहंतांपैकी काहींनी दहाच्या संख्येत, काहींनी शेकडोंच्या संख्येत, काहींनी हजारोत व काहींनी लाखोंच्या संख्येत या यक्ष-देवांना पाहिले. काहींनी तर सर्व दिशा या देव-ब्रह्मांनी भरलेल्या पाहिल्या, म्हणजे त्यांना अगणित संख्येत पाहिले.

आम्ही आपल्या आश्रमातही पाहिले आहे की ज्या-ज्या लोकांनी दिव्यदृष्टी प्राप्त केली आहे त्यांची शक्ती एकसारखी नाही. एक दिव्य-दृष्टीधारी आपल्यासमोर शंभर देवांची परिषद बसलेली पाहतो, तर दुसरा हजारची व तिसरा त्यापेक्षा कितीतरी अधिकची. परंतु ज्या शंभर देवांना प्रथम द्रष्टा पाहतो व ज्या रूपात पाहतो, त्यांना त्याच रूपात अन्य द्रष्टाही पाहतात. फरक हाच आहे की ते पहिल्या द्रष्ट्यापेक्षा काही जास्त पाहू शकतात. त्यांची दिव्यदृष्टी अधिक तीक्ष्ण आहे. ते अधिक दूरद्रष्टा आहेत. दिव्यदृष्टीचा साधक एखाद्या खोट्या कल्पनेत तर वाहत जात नाही, यासाठी दोन द्रष्टांद्वारे पाहिल्या गेलेल्या दृश्यांची वेगवेगळी माहिती घेऊन सत्याची तपासणी केली जाते. तेव्हाच ते मान्य होते.

एक अन्य बाब जी या देवांच्या विषयी लक्ष देण्याची आहे, ती ही आहे की यांच्या प्रशंसेत खोटी अतिशयोक्ती केली गेलेली नाही. जवळपास सर्वांसाठीच म्हटले गेले आहे-

**... महब्बला; इद्धिमन्तो जुतिमन्तो वण्णवन्तो यसस्सिनो।**

*(– दी.नि. २.७.३३६, महासमयसुत्तं)*

- म्हणजे ते महाबलशाली आहेत, ऋद्धिमान आहेत, प्रकाशवान आहेत, तेजस्वी आहेत व यशस्वी आहेत.

बलवान व ऋद्धिमान असणे जवळपास सर्व अदृश्य देव-यक्षांचा सामान्य गुण आहे. मनुष्याच्या तुलनेत हे अधिक बलवान आहेत व अधिक ऋद्धिमान आहेत, तसेच वायवीय शरीर असल्यामुळे अशी काम करू शकतात जी मनुष्यांसाठी पूर्णपणे असंभव आहेत. आपल्या पूर्व जन्मांच्या सुकर्मांमुळे काही-काही मूलतः प्रकाशवान नसतांनाही कमी वा अधिक प्रकाशवान व ज्योर्तिमयही आहेत. काही-काही सद्धर्माची विपश्यना भावना शिकून प्रकाशवान व वर्णवान झाले आहेत. असे आपल्या इथेही नेहमी होते. काही-काही निम्न कोटीचे प्राणी जेव्हा गुरुच्या संपर्कात येऊन ध्यान शिकणे आरंभ करतात तेव्हा त्यांची आकृती भयानक व रंग खूप काळा असतो, परंतु तेच ध्यानाच्या उच्च स्तरावर पोहोचता-पोहोचता अत्यंत प्रकाशवान, तेजस्वी व वर्णवान होतात.

हे अदृश्य देव आमचे रक्षण तेव्हाच करतात जेव्हा आम्ही सद्धर्माच्या मार्गावर चांगल्या प्रकारे चालतो, शील-संयम धारण करतो, चित्त एकाग्र करून विपश्यनेच्या ध्यानात बसतो. तेव्हा आमच्या आतून जे भाव-तरंग उत्पन्न होतात, त्यामुळे प्रसन्न होऊन ते सारे देव, जे ह्या ध्यानमार्गाचे अवलंबी आहेत, प्रमोदित होऊन आमच्या आस-पास येऊन बसतात व ध्यानात आमची सोबत करतात. या प्रकारे अनेक अदृश्य साधकांची उपस्थिती वातावरणाला अधिक शांत व निर्मळ बनवते. आमचे ध्यान अधिक दृढ होत जाते, चित्तमळाचा लवकर क्षय होतो व विशुद्ध अवस्था लवकर प्राप्त होते. या प्रकारे हे सम्यक देव आमचे रक्षण करतात. धर्मपालनात आम्हाला आधार देतात. परंतु हे सर्व तेव्हाच होते, जेव्हा आम्ही स्वतः धर्ममार्गावर चालतो. अन्यथा न कोणी देव जवळ येईल, न कोणतीही दैवी सद्वृत्ती अशा सम्यक सन्मार्गी देवांच्या प्रती आदरभाव ठेवण्यात कोणताही दोष नाही, तसेच जसे एखाद्या सत्पुरुष, संत मानवाप्रती आम्ही आदरभाव ठेवतो. बस यापेक्षा अधिक नाही.

या महासमय सुत्ताच्या शेवटी आम्ही पाहतो की जेथे इतके देव-ब्रह्मा एकत्रित झाले आहेत तेथे दुष्ट देव मारही आपल्या सनेसह येऊन उपस्थित झाला. या माराचा एकच स्वभाव आहे ज्याची घोषणा करत तो प्रवेश करतो - 'या ! पकडा ! बांधा ! सर्वांना आसक्तीच्या वशात करा !चोहीकडून घेरुन टाका. कोणीही वाचता कामा नये !' आपल्या स्वभावानुसार त्याला यात सुख मिळते की जास्तीत जास्त लोक आसक्ती, द्वेष व मोहाच्या जाळ्यात अडकून राहोत. यातून बाहेर निघण्याचा प्रयत्न करणारा प्रत्येक प्राणी त्याला अप्रिय वाटतो. तो प्रत्येक संभाव्य प्रकाराने, उपाय-साधनांनी त्यांना बांधण्याचा प्रयत्न करतो. याच मार देवाला आम्ही यम देव म्हणू शकतो. यम देव म्हणजे मृत्यूचा देव म्हणजे मृत्यूच्या साम्राज्याचा अधिपती. जेव्हा कोणी मृत्यूच्या चक्रातून निघून खरोखर अमर अवस्था प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा त्याच्या  भुवया वर चढतात, त्याला राग येतो. आपल्या गुलामाला कोण मुक्त करेल बरे ?

मुक्ती मार्ग अवलंबणाऱ्या विपश्यी साधकांना या मारापासून सदैव सतर्क राहिले पाहिजे. याला जिंकण्याचा उपाय खूप सोपा आहे आणि तो हा आहे की प्रतिक्षण सतर्क राहावे. जागृत झाल्याबरोबर मार सेना विलीन झाली. या चोरला पाय नसतात. घराचा मालक जागला की चोर पळाला. खूप सोपा उपाय आहे. कोणीही प्रयोग करून पाहू शकतो. जेव्हा कधी मनात प्रबळ काम वासना जागेल, तेव्हा केवळ क्षणभरासाठी मनुष्य सतर्क होऊन केवळ या तथ्याला जाणेल की ओह ! माझ्यात ही काम वासना जागत आहे. बस केवळ इतके पाहणे-जाणणे झाले की काम वासना लाजाळूच्या पानांप्रमाणे लपली. जशी नव्हतीच. हीच दशा क्रोधाची आहे, अहंकाराची आहे, ईर्षेची आहे. जसे जागे होतील तसेच पाहा. हे तिथेच विलुप्त होतील. परंतु लोक पाहातात कुठे ? जसा कोणताही विकार जागतो, तसे त्या विकाराच्या अधीन होतात आणि त्या वेळेस तर जागरूकतेचे नावनिशाणही नसते. बस केवळ तो विकारच डोक्यावर चढून बसतो व डोके त्या विकाररूपी पाण्याखाली बुडलेले असते. खूप वेळ गेल्यानंतर जेव्हा शुद्ध येते तेव्हा मनुष्य त्या विकाररूपी माराच्या अधीन असतांना केलेल्या मूर्खपणाचे स्मरण करून पश्चाताप करतो. परंतु तेव्हा काय होईल ? हे जागरूकतेचे हत्यार तेव्हाच कामात येते जेव्हा वैरी हल्ला करुन आपला ताबा घेत असेल. त्यानंतर पश्चाताप करणे बिल्कुल निरर्थक आहे.

त्यामुळे या, या मार-बंधनातून मुक्त होऊ व धर्म-साधनेच्या मार्गावर चालत आपले मंगल साधू. यातच सर्वांचे कल्याण सामावले आहे.

शुभार्शिवाद,

सत्यनारायण गोयन्का

## भदंत ञाणीसारजींचे उद्गार

*(संगाई, ब्रह्मदेशाचे प्रसिद्ध भिक्षू सितगू सयाडो (भदंत ञाणीसारजी) पूज्य गोयन्काजींचे खूप मोठे प्रशंसक आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली पूज्य गोयन्काजींच्या अस्थी-विसर्जनाच्या वेळी ब्रह्मदेशातील रंगून, मचीना व मांडलेत हजारो लोक एकत्र झाले. मांडलेत शेकडो भिक्षु व भिक्षुणींनी धम्ममंडल विपश्यना केंद्रापासून पासून पमादी जेट्टी तटापर्यंत अस्थी-कलशाच्या यात्रेत  खालील गाथांचा सस्वर पाठ केला. पाच मोठ्या नावांवर स्वार होऊन इरावती नदीच्या मध्यभागात चारही बाजूंनी गोल घेरा बनवून सर्व लोकांनी एक हजार दीपक प्रवाहित करून श्रद्धांजली अर्पित केली. कलश यात्रा आरंभ करण्यापूर्वी केंद्रावर संघदानाचे आयोजन केले गेले होते. उपस्थित भिक्षुसंघ व गृहस्थांना संबोधित करत त्यांनी खालील शब्दात आपली श्रद्धांजली अर्पित केली.)*

**अनिच्चा वत सङ्खारा, उप्पादवयधम्मिनो।**
**उप्पज्जित्वा निरुज्झन्ति, तेसं वूपसमो सुखो।।**

- खरोखर सारे संस्कार अनित्यच आहेत. उत्पन्न होणाऱ्या साऱ्या स्थिती, वस्तू, व्यक्ती अनित्यच आहेत. उत्पन्न होणे व नष्ट होणे, हा यांचा

धर्मच आहे, स्वभावच आहे. विपश्यना साधनेच्या अभ्यासाद्वारे उत्पन्न होऊन निरुद्ध होणाऱ्या या प्रपंचाचे जेव्हा पूर्णपणे उपशमन होते - पुन्हा उत्पन्न होण्याचा क्रम समाप्त होतो, त्याचेच नाव परम सुख आहे, तेच निर्वाण सुख आहे.

कुशीनाराच्या दक्षिण-पश्चिम भागात जेव्हा भगवानांचे परिनिर्वाण होत होते तेव्हा तावतिंस देवलोका मधून शक्र (इंद्र) देवतांसह या पृथ्वीवर (मनुष्यलोकात) उतरले व भिक्षुसंघासमोर याच गाथेचा पाठ केला. महाब्रह्मासह मोठ्या संख्येने ब्रह्मागणांनी एकत्र होऊन पुष्पांजली अर्पित केली. त्या दिवशी पुष्कळशा भिक्षूंचा संघ भगवानांना अंतिम श्रद्धांजली देण्यासाठी एकत्र झाला होता. ठीक याचप्रमाणे जसे आज आम्ही श्री गोयन्काजींना श्रद्धांजली देण्यासाठी एकत्र झालो आहोत. आयुष्मान सारिपुत्र व महामोग्गल्लान पूर्वीच परिनिर्वाणास प्राप्त झाले होते. आयुष्मान महाकाश्यप जे शासनाचे काम पुढे नेणार होते, येऊ शकले नव्हते. त्यामुळे पार्थिव शरीराच्या दहन-क्रियेची जबाबदारी आयुष्मान अनुरुद्ध सांभाळत होते.

तेव्हा महाब्रह्मा सहम्पतीने एका गाथेचा पाठ केला, देवराज शक्राने एका गाथेचा पाठ केला, भदंत अनुरूद्धांनी दोन गाथांचा पाठ केला, आयुष्मान आनंदांनी एका गाथेचा पाठ केला. या प्रकारे भगवानांच्या पार्थिव शरीराचे अंतिम दर्शन करत सर्व लोकांनी प्रणाम केला.

आचार्य श्री गोयन्काजींचा मृत्यू मुंबई, भारतात झाला. तेथे त्यांचा दहन-संस्कार केला गेला. ते मांडलेचे नागरिक होते व त्यांचे आपल्या मातृभूमीवर खूप प्रेम होते. ते म्यंमाच्या एका कट्टर हिंदू परिवारात जन्मले, परंतु नंतर विपश्यनेचे समर्थक व प्रबळ प्रचारक झाले. विपश्यनेच्या प्रती त्यांची अगाध श्रद्धा होती कारण विपश्यनेने त्यांच्या दुःखांना दूर केले होते. विपश्यनेच्या प्रती त्यांची श्रद्धा दोन बाबींवर होती - एक तर सयाजी ऊ बा खिन, ज्यांनी त्यांना सांसारिक चिंता व दुःखातून मुक्त केले होते व त्यांचे गुरू सया तै जी तसेच त्यांचेही गुरू भदंत लैडी सयाडो, ज्यांनी गृहस्थ आचार्य परंपरेचे द्वार उघडले.

दुसरी बाब ही होती की श्री गोयन्काजी म्यंमाच्या भिक्षुसंघाच्या प्रती खूप कृतज्ञ होते, ज्यांनी या परंपरेला २५०० वर्षांपर्यंत शुद्धरूपात सांभाळून ठेवले. हे एक असे कार्य होते ज्याला साधारण ब्रह्मदेशी भिक्षुसंघ समजू शकला नाही, भारतीय गोयन्काजी याच्ये महत्व चांगल्या प्रकारे समजले. याच तथ्यांनी श्री गोयन्काजींना भारतात विपश्यना केंद्र स्थापन करण्याची प्रेरणा दिली व संपूर्ण विश्वात विपश्यनेच्या प्रचार-प्रसारासाठी प्रेरित केले. मी स्वतः ही गोष्ट श्री गोयन्काजींना सांगितली व अनेक प्रसंगी दुसऱ्यांनाही सांगितले की सम्राट अशोकानंतर श्री गोयन्काजीच अशी व्यक्ती होती जिने धम्माचा प्रसार भारतातच नाही तर संपूर्ण विश्वात केला.

वस्तुतः मी त्यांना कमीत-कमी तीन वेळा म्हटले की आपण आधुनिक अशोक आहात. यावर ते म्हणाले, 'अशोकाशी माझी तुलना केली जाऊ शकत नाही. हो, त्याच मोठ्या परंपरेशी एकरूप होऊन मी आपले जीवन जगू इच्छितो.' दोनदा त्यांनी असेच म्हटले, परंतु तिसऱ्यांदा जेव्हा आम्ही दोघेही मुंबईच्या समुद्रतटावर फिरत होतो, तेव्हा पुन्हा मी त्यांची तुलना अशोकाशी केली, तेव्हा त्यांनी केवळ स्मित केले, ठीक याचप्रकारे जसे आपण या चित्रात पाहत आहात. मी त्यांना म्हटले की भारतात आज वीस ब्रह्मदेशी संघाराम आहेत, परंतु आपल्याप्रमाणे कोणीही एकही विपश्यना केंद्र स्थापित करू शकले नाही.

हो, यापूर्वी आचार्य आयुष्मान महसी सयाडो व टांग पुलु सयाडोंनीच केंद्र स्थापित केली. त्यांच्यानंतर कोणाचीही तुलना गोयन्काजींशी केली जाऊ शकत नाही. त्यामुळे म्हणतो की आपण आजचे अशोक आहात तेव्हा त्यांनी फक्त स्मित केले.

ते म्हणाले की भारत धम्माची जन्मभूमी आहे, परंतु आज शुद्ध धर्म येथून लुप्त झाला आहे. आम्हा सर्वांचे कर्तव्य ठरते की आम्ही त्याला पुनर्जीवित करावे. मी मुद्दाम त्यांना विचारले की धम्माचे त्यांचे तात्पर्य काय आहे ? (धम्म म्हणजे त्यांना नेमके काय म्हणायचे आहे) ते म्हणाले की धर्म एक अनुशासन आहे, एक विचारधारा आहे, एक विधी आहे, एक तंत्र आहे. जोपर्यंत सत्य लक्षात येत नाही, जीवन-मरणाच्या अंतहीन चक्रात सापडून दुःखमय जीवन जगत राहू.

आदरणीय लोकांनो, गोयन्काजींचे जाणे अशोकाचे जाणे आहे. गोयन्काजी गेले, म्हणजे आधुनिक अशोक गेले. त्यांच्या जाण्यामुळे जगाचे दोन्ही डोळे गेले. जग आंधळे झाले. संपूर्ण जग दुःखी आहे, प्रभावित आहे - इंग्रज, अमेरिकन, अरब इत्यादी सर्वच. श्री गोयन्काजी असे होते जे कट्टर मुस्लिमालाही शिबिरात बसवायचे, जे हा विश्वास ठेवतात की फक्त अल्लाहचे वचनच सत्य आहे. त्यांनी या लोकांनाही आपल्या विपश्यना केंद्रात जागा दिली व इस्त्रायलच्या यहूदींनाही. त्यामुळे मी म्हणतो की त्यांच्या जाण्याचा अर्थ आहे की अशोकाप्रमाणे एका धर्मदूताचे जाणे. एका अशा व्यक्तीचे जाणे जिने जगाला डोळे दिले. आता मला ही कलश यात्रा आरंभ करण्याची अनुमती द्या व यादरम्यान शक्राद्वारे गायल्या गेलेल्या त्या गाथेलाही समजून घ्या. **अनिच्चावत सङ्खारा...।**

**सङ्खार**- कर्म, चित्त, ऋतू व आहाराचे मिश्रण आहे. तसेच भौतिक पदार्थांपासून बनलेले हे भवनही अनित्य आहे. याला आम्ही धर्मगाव म्हणू शकतो कारण येथे धर्मोपदेश होतो. जर आम्ही येथे भोजनाची विक्री करू तर हे हॉटेल होईल. जर इथे राजा व राणी राहतील तर हा राजमहाल होईल. जर येथे सामानाची विक्री करू तर हा बाजार होईल. परंतु वस्तुतः हे आहे काय ? हे विटा, लोखंड, लाकूड, सीमेंटचे मिश्रण आहे. हे घरही आहे, महालही आहे, प्राणी संग्रहालयही आहे व शौचालयही. हे सर्वांसाठी एकसमान आहे. चीनी, इंग्रजी, भारतीय, ब्रह्मदेशी, ब्रह्म, देव, कोंबडी वा कुत्र्यासाठीही. या सर्वांचे रूप, नाम व हेतू- हे तिन्ही आहेत. या तिन्हींचे मिश्रण संस्कार आहेत. या तिघांचा गुण, धर्म, स्वभाव जसे वर म्हटले गेले, उत्पाद व व्यय आहे, बनणे व नष्ट होणे आहे. व्ययानंतर उत्पन्न होते व पुन्हा व्यय होतो. या प्रकारे हा क्रम अनंत चक्रवालांपर्यंत चालत राहातो.

विपश्यना काय आहे ? हा एक विधी आहे. आम्ही ध्यानाला आपल्या आत केंद्रित करतो, उत्पाद-व्ययाचा शोध घेतो. हे एक असे सत्य आहे जे आमच्या शरीराच्या आत अनुभव केले जाते. जे उत्पन्न होते ते नष्ट होते आणि नष्ट झाल्यानंतर पुन्हा उत्पन्न होते. **यदनिच्चं तं दुक्खं**– जे अनित्य आहे ते दुःख आहे, म्हणजे जेथे अनित्यता आहे, तेथे दुःख आहे आणि जे अनित्य व दुःख आहे ते अनात्मच आहे. त्याला 'मी-माझे' म्हणता येत नाही. त्यामुळे अनित्य, दुःख व अनात्म वेगवेगळे नाही. ते तिन्ही एकच आहेत. अनित्यता कशात आहे ? उत्पाद व व्ययात. तर विपश्यनेत काय पाहतो ? जे सत्य आहे त्याला पाहतो. खरे सत्य काय आहे ? या तीन मूळ बाबी - नाम, रूप व हेतू या तिन्ही मूळ बाबींवर ध्यान केंद्रित करण्याचा प्रयत्न करणे उत्पाद-व्ययाची क्रिया उजागर करणे आहे व यामुळे होणाऱ्या दुःखाला समजणे आहे. याला समजल्यावर अनात्म समजते व हेही की आपण किती असहाय्य आहोत. आपला ताबा या तिन्हींवर मुळीच नाही. या प्रकारे ध्यान करण्यामुळे नाम-रूपाने बनलेल्या या शरीराविषयीची आसक्ती हळूहळू कमी होऊ लागते. हेच आमच्या सर्वांच्या आतील सत्य आहे.

या सत्याचे ज्ञान देणाऱ्या भगवान बुद्धांना प्रणाम करत देवराज शक्राने वरील गाथेने वंदन केले, याच प्रकारे इतर सगळ्यांनी आपली श्रद्धासुमन अर्पित केली. आम्हालाही श्रद्धासुमन अर्पित करतांना हेच म्हणायचे आहे की निर्वाण व संसारात फार अंतर नाही. निर्वाण आपल्यापासून तितके दूर नाही. याला एका उदाहरणाने समजा.

इरावती नदीचे जल या किनाऱ्याच्या तटाला दुसऱ्या किनाऱ्याच्या तटाहून वेगळे करते. जेव्हा नदी भरलेली असते तेव्हा दोन्ही तटातील अंतर जास्त असेल. परंतु जेव्हा जलस्तर कमी होत जातो तेव्हा तटातील अंतर कमी होत जाते. शेवटी जेव्हा नदीत पाणी नसते तेव्हा दोन्ही तट एक होतात. दोन्ही तटांच्या मध्ये भिंत नसते, अडथळा नसतो. एका तटापासून दुसऱ्या तटाची यात्रा अखंड होते, सोपी होते.

हे तथ्य खूप महत्वपूर्ण आहे. आम्ही आपल्या मनाला चित्तमळ-जलाने भरू नये. याच चित्तमळाने भरलेल्या जलराशीमुळे आम्ही त्या किनाऱ्याच्या तसल्या निर्वाणाला पाहू शकत नाही. निर्वाण वस्तुतः शरीरा (संसारा) च्या सोबतच चालते. चित्तमळाच्या कारणामुळे दोन वेगवेगळे तट दिसतात. विपश्यना या क्लेश-जलाला प्रज्ञारूपी माठाने बाहेर फेकत जाते. हे यावर निर्भर करते की एखाद्या विपश्यना केंद्रात जाऊन आपण दहा दिवसात किती जल बाहेर फेकले आहे. जलाला वाढू दिले नाही तर हळूहळू त्या तटाच्या जवळ जातच राहू. जेव्हा सर्व जल समाप्त होईल, तेव्हा दोन्ही तट एक होतील. संसार व निर्वाण एक होईल.

जो वेळ माझ्याजवळ आहे त्यात येवढेच सांगू शकतो. आज आम्हाला आचार्य श्री गोयन्काजींच्या अस्थींचे विसर्जन इरावती नदीत करावयाचे आहे, तेव्हा त्यांना अंतिम प्रणाम करण्यासाठी आम्हीही या गाथेचा पाठ करूया. याव्यतिरिक्त अजून कोणताही पाठ नाही, कोणतीही कविता नाही. आम्ही केवळ याचाच पाठ करत राहू व आपल्या आतील अनुभूतींनाही पाहात राहू. **अनिच्चावत सङ्खारा...।**

Registered No. NSK/271/2014-2016

## पाली प्रशिक्षण कार्यक्रम - २०१५, विपश्यना विशोधन विन्यास, ग्लोबल विपश्यना पॅगोडा, मुंबई

१. एका महिन्याचा निवासीय सघन पाली-हिंदी पाठ्यक्रम- १० जानेवारी ते १२ फेब्रुवारी,
२. उच्च पाली-व्याकरण कार्यशाळा- १३ ते १७ फेब्रुवारी,
३. पाली वाचणे-लिहिणे शिकणे (-ब्रह्मदेशी, रोमन व देवनागरीत) - १०ते १९ मे,
४. पाली-इंग्रजी सघन निवासीय पाठ्यक्रम - २५ मे ते ९ ऑगस्ट,
५. अनुवाद कार्यासाठी कार्यशाळा - १० ते १७ ऑगस्ट,
६. अशोकाचे शिलालेख व ब्रह्मी लिपी कार्यशाळा - १ ते ५ ऑक्टोंबर,
७. उच्च पाली-व्याकरण कार्यशाळा - ३ ते १४ नोव्हेंबर,
८. शोध-प्रणालीवर कार्यशाळा - १५ ते १९ नोव्हेंबर,

**या कार्यक्रमात भाग घेण्याची पात्रता (योग्यता) -**

अ) ज्यांनी कमीतकमी **तीन** १०-दिवसीय व **एक** सतिपट्ठान शिबिर केले असेल.
ब) स्नातक डिग्री वा १५ वर्षांपर्यंत शाळेचा पाठ्यक्रम पूर्ण केला असेल.
क) अनुवाद व पाली-व्याकरणासाठी - ज्यांनी वि.वि.वि. द्वारे संचालित निवासीय पाली-पाठ्यक्रम पूर्ण केला असेल वा पालीत स्नातकोत्तर डिग्री प्राप्त केली असेल.

**विन्यासने खालील विषयांवर शोधाचे आयोजन केले आहे -**

१. संत वाणीत विपश्यना; २) त्रिपिटकात आयुर्वेदिक तत्व;
३. विपश्यनेने बदल - तेव्हा व आता;
जर कोणी या विषयांवर काही काम केले असेल तर त्याचे स्वागत आहे.
**संपर्क-** ईमेल- mumbai@vridhamma.org; फोन- +91-22-33747560.

## नालंदेत १०-दिवसीय शिबिर व विपश्यना केंद्र

ऐतिहासिक नव नालंदा महाविहार, नालंदाच्या सांस्कृतिक ग्रामात सरकारने विश्व विद्यालयाच्या विद्यार्थी इत्यादींच्या लाभार्थ जवळपास ३०-३५ लोकांचे विपश्यना शिबिर नियमित होत राहील, अशी व्यवस्था केली आहे. यात गेल्या २७ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर पर्यंत भरलेल्या शिबिरात अनेक शोध-विद्यार्थी, प्राध्यापक व सरकारी अधिकाऱ्यांनी भाग घेतला. ८ ब्रह्मदेशी भिक्षूही लाभान्वित झाले. पुढील शिबिर १० ते २१ ऑक्टोंबरपर्यंत होईल.

## नव नियुक्ती

### सहायक आचार्य

१. कु. पारमिता सिन्हा, कोलकाता
२. श्री दत्तात्रय तायडे, मुंबई
3. Mr. Mudar Mannah, Germany
4. U Tun Tun Oo, Myanmar
5. U Soe Min Aye, Myanmar
6. Daw Khin Khin Win, Myanmar
7. Daw Tin Tin Oo, Myanmar

### बालशिबिर-शिक्षक

१. श्रीमती इंदुबेन कापडी, कच्छ
२-३. श्री शीतल व श्रीमती सुजाता मुळे, सांगली
४. श्री प्रशांत मगदूम, सांगली
५. श्रीमती वर्षा तांबे, रत्नागिरि
६. डॉ. मेघना शेंडे, छिंदवाड़ा, म.प्र.
७. श्री केतन मेहता, भोपाल
८-९. श्री गोविंद व श्रीमती प्रीति वाणी, इगतपुरी
10. Mr Patrick Houston Australia
11. Mrs Tali Krieger Australia
12. Ms. Cornelia Pietschmann Germany
13. Mrs. Nayeli Weippert Germany
14.Mr Stijn Baecke Netherlands

## सयाजी ऊ बा खिनांच्या पुण्यतिथीनिमित्त एक दिवसीय महाशिबिर

**१८ जानेवारी २०१५ ला, पूज्य माताजींच्या उपस्थितीत *'विश्व विपश्यना पॅगोड्यात'* एक दिवसीय महाशिबिर होईल. शिबिर वेळ-** सकाळी **११** ते दुपारी **४** वाजेपर्यंत. येथे ३ वाजताच्या गुरुदेवांच्या अस्थी विसर्जन व्हिडियो कार्यक्रमात साधना न केलेले लोकही बसू शकतात. नोंदणीसाठी कृपया खालील फोन नंबरांवर वा ईमेलने त्वरित संपर्क साधावा. कृपया नोंदणी केल्याविना येऊ नये व **समग्गानं तपोसुखो** - सामूहिक तपसुखाचा लाभ घ्यावा. नोंदणी **संपर्क:-** फोन नं.:-०२२-२८४५११७०/०२२-३३७४७५-०१/४३/४४ Extn.९, (फोन नोंदणी सकाळी ११ ते सायं ५ पर्यंत, रोज) Online Registration: www.oneday. globalpagoda .org

## दोहे धर्माचे

चार सत्य हे जगाचे, ह्यावर असो विश्वास।
मार्ग हाची मुक्तीचा, सोडा परकी आस।।
आठ अंगी आर्यपथ, देय बुद्ध भगवान।
पाऊल पाऊल चाल, प्रकटते पद निर्वाण।।
बैस पालथी मारून, काया सरळच राख।
मौन मौन मन मौन कर, चाख धर्म रस चाख।।
दुःख मूल उत्खननास, वाट सापडे ज्यास।
तोच सुख शांतीचा हो, खराच राजा खास।।
प्रज्ञा शील समाधीची, वाहे त्रिवेणी धार।
बुडी मारे तोच तरे, हो दुखसागर पार।।

## दोहे धर्माचे

मृत्यू येई पाहूनी, संत न होय उदास।
बसे पालथी मारून, सोडे अंतिम श्वास।।
निजहित परहित सर्वहित, जगतो संत सुजाण।
निजहित परअनहित करे, दुर्जन ओळख जाण।।
संत संत सर्वसमान, हिंदू बौद्ध जैन।
आसक्ती द्वेष त्यागून, सदा करे सुखचैन।।
संत अमृत वाटत असे, पिती क्वचितच सुजन।
पात्र फुटे वाहत जाय, कसे हो अमृत ग्रहण।।
नाम रूप दोन्ही जळे, जळे सर्व संसार।
थंड तलावासम असे, संत सदा अविकार।।

**श्री गोयन्काजी व विपश्यनेप्रती असीम कृतज्ञतेसह**
Email: - thetriplegems8@gmail.com

'विपश्यना विशोधन विन्यास' साठी प्रकाशक, मुद्रक व संपादक: राम प्रताप यादव, धम्मगिरि, इगतपुरी-422 403, दूरध्वनी : (02553) 244086, 244076.
मुद्रण स्थान : अक्षर चित्र प्रिंटिंग प्रेस, 69- बी रोड, सातपूर, नाशिक-422 007. **बुद्धवर्ष 2558, आश्विन** पौर्णिमा, **८ ऑक्टोबर, २०१४**

**वार्षिक शुल्क** रु. **30/-,** US $ 10, **आजीवन शुल्क** रु. **500/-,** US $ 100. **Registered No. NSK/271/2014-2016**

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.)

**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरि, इगतपुरी - 422 403
जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत
**फोन :** (02553) 244076, 244086, 243712, 243238. **फैक्स :** (02553) 244176
Email: info@giri.dhamma.org
Website: www.vridhamma.org